देशदूत

नाशिक आवृत्ती

epaper.deshdoot.co
22 Feb 2025 - Page 8

# के. के. वाघ शिक्षण संस्थेची नेत्र तपासणी शिबिर

**नाशिक ।** के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक, के के वाघ फाऊंडेशन, श्री. बाळासाहेब वाघ वेलफेअर फाऊंडेशन, स्माईल व स्पिरीच यांचे संयुक्त विद्यमाने दिवंगत बाळासाहेब वाघ यांच्या स्मृती प्रित्यर्थ निफाड तालुक्यात मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. काकासाहेबनगर, भाऊसाहेबनगर, पिंपळस, चांदोरी आणि वऱ्हेदारणा येथे शिबिर पार पडणार आहे. नागरीकांनी नेत्र तपासणीसाठी आधार कार्ड घेऊन येणे अनिवार्य आहे. नाव नोंदणीसाठी संदिप शिंदे व ज्ञानेश्वर गवळी यांच्याशी संपर्क साधावा आणि शिबीराचा जास्तीत जास्त नागरीकांनी लाभ घ्यावा असे संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ यांनी केले आहे.